# महात्मा गांधी यांची विश्वस्त कल्पनाआणि आर्थिकसमता

**डॉ. मिलन नरहर वालावलकर**, अर्थशास्त्र विभाग, गोगटे वाळके कॉलेज, बांदा (सिंधुदुर्ग)

---

**प्रस्तावना:**

देशामध्येआर्थिक वसामाजिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही हे लक्षात घेऊन समता प्रस्थापित करण्यासाठी जागतिक पातळीवर गेल्या दोन शतकात प्रयत्न होत असल्याचे दिसून येते.जगातील अनेक देशांना आर्थिक विषमतेच्या प्रश्नाने कित्येक शतकांपासून ग्रासले आहे. आर्थिक विषमता दूर करण्यासाठी काही देशात क्रांती झाल्या तर अलीकडे काही देशात वर्ग युद्धही झाले. आर्थिक विषमता दूर करण्याचा मार्ग क्रांती असो अथवा वर्ग युद्ध असो या दोन्ही मध्ये रक्त सांडले. परंतु गांधीजींनी रक्ताचा एकही थेंब न सांडता अहिंसक मार्गाने आर्थिक विषमता दूर करण्याचा अत्यंत अभिनव मार्ग सांगितला. त्यालाच गांधीजींचे विश्वस्तपणाचे तत्त्व असे म्हटले जाते.

**विश्वस्त संकल्पना:** महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारात विश्वस्त कल्पना अतिशय महत्त्वाची आहे. त्यांच्या मते श्रीमंताने केवळ समाजाच्यावतीने संपत्तीचे विश्वस्त म्हणूनवागू नये तर ती संपत्ती समाजासाठी खर्च करावी.त्यांच्या मते,जगात जे आहे ते सर्व परमेश्वराने व्यापलेले आहे त्याची अभिलाषा करू नये. विश्वस्तपणाचाअर्थ गांधीजींनी अत्यंत सोप्या भाषेत सांगितला आहे. गांधीजी म्हणतात,'तुम्ही करोडो रुपये खुशाल मिळवा पण लक्षात ठेवा की तुमची संपत्ती ही तुमची नाही ती लोकांची आहे. तुमच्या न्याय गरजा भागवण्यासाठी तुमच्या संपत्तीतून आवश्यक तेवढेच घ्या. पण बाकी उरलेली संपत्ती समाजासाठी वापरा म्हणजे समाजातील दीनदुबळया गोरगरीब लोकांच्या सेवेसाठी तुमच्या बाकीच्या संपत्तीचे तुम्ही विश्वस्त व्हा.'

'विश्वस्त म्हणजे दुसऱ्याच्या मालमत्तेचा व्यवस्थापक होय' असा विश्वस्त या शब्दाचा अर्थ आहे. गांधीजींनी असे प्रतिपादन केले की श्रीमंतांनी त्यांच्या न्याय गरजा भागवण्यात इतकाच पैसा आपल्या संपत्तीतून घ्यावा व राहिलेला बाकीचा पैसा समाजातील दिन-दुबळे. गोर-गरीब यांच्या सेवेसाठी वापरावा असे सांगताना गांधीजींना म्हणावयाचे होते की तुम्ही मिळविलेल्या पैशातील तुमच्या न्याय गरजेसाठी जेवढा पैसा तुम्हाला लागेल तेवढाच पैसा तुमचा बाकीचा सर्व पैसा समाजातील दिन-दुबळे, गोर-गरीब यांचा आहे. तुम्ही फक्त या दिनदुबळयांच्या गोरगरिबांच्या त्या पैशाचे व्यवस्थापक आहात.

१९४६मध्ये गांधीजींनी भांडवलदारांना बजावले की वर्ग युद्ध आणि स्वेच्छेने संपत्तीचे रूपांतर विश्वस्त म्हणून करणे या दोन्ही कशाची निवड करायची हे प्रत्येकाने ठरवावे. भारताला प्रगतीपथावर नेण्यासाठी व्यवस्थापन व संघटन क्षमता आणि कौशल्य हे गुण श्रीमंतांकडे आहेत याची जाण गांधीजींना होती. ज्यांना संपत्ती संग्रहण करता येते त्यांची गरिबांना मिळणारी देणगी बंद झाली तर समाज अधिक गरीब होईल. विश्वस्त महत्त्वाचे आहेत, त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे, याची त्यांना जाण होती. विश्वस्ताने गरजेपुरती संपत्ती वापरावी आणि उरलेल्या संपत्तीचा विश्वस्त म्हणून कार्य करावे. विश्वस्ताने प्रामाणिकपणे काम करावे हे गृहीत होते. विश्वस्ताने समाज कल्याणासाठी संपत्ती वापरावी असा त्यांचा विचार होता. गांधीजींची विश्वस्त कल्पना भांडवलशाहीच्या शोषणाला पर्यायी व्यवस्था होती. गरिबांच्या शोषणामुळे त्यांनी भांडवलदारांवर टीका केली. विश्वस्त बनून त्यांनी कार्य करावे हा पर्याय त्यांनी सुचवला होता. खाजगी मालमत्तेला समाज मान्यता राहील परंतु श्रीमंतांनी देखील गरिबांच्या कल्याणासाठी प्रयत्न केले पाहिजे. गरिबांचे विश्वस्त म्हणून त्यांनी मालमत्ता वाढवावी, विश्वस्तानी मालमत्ता बाळगावी आणि मालमत्तेचा वापर गरिबांच्या कल्याणासाठी करावा. श्रीमंतांनी विश्वस्त म्हणून कार्य केले तरच त्यांना मालमत्ता बाळगता येईल. समाजाच्या कल्याणासाठी संपत्तीचा वापर होणे आवश्यक आहे.

महात्मा गांधीजींची विश्वस्ताची कल्पना ही त्यांच्या आर्थिक विचारांचा महत्त्वाचा भाग आहे. गांधीजींचा असा आत्मविश्वास होता की, विश्वस्ताच्या कल्पनेमुळे पृथ्वीवर समतेचे राज्य प्रस्थापित होऊ शकेल. संपत्ती निर्माण करण्यासाठी सर्वांच्या मदतीची आवश्यकता असते. सर्व संपत्ती ही ईश्वरी संपत्ती आहे. त्यामुळे संपत्तीवर सर्वांचीच मालकी प्रस्थापित झाली पाहिजे. एखाद्या जवळ जास्त संपत्ती असेल तर तिचा उपयोग त्याने समाजाचा विश्वस्त या भावनेने करावा. काळाप्रमाणे भांडवलदार व श्रीमंत लोक आपली धोरणे बदलतील आणि ते आपल्या संपत्तीचा उपयोग गरिबांच्या कल्याणासाठी करतील. पण समजा असे झाले नाही तर समाजात हिंसक कार्य होणे अपरिहार्य आहे. उत्पादन

हे व्यक्तीच्या हव्यासापोटी न करता समाजाच्या गरजेसाठी केले जावे. खाजगी व वैयक्तिक संपत्तीचा विचार महात्मा गांधी यांनी नैतिक दृष्टिकोनातून केला होता. संपत्तीधारकाने आपल्या गरजा मर्यादित ठेवल्या पाहिजेत. उरलेल्या संपत्तीचा विनियोग लोककल्याणासाठी केला पाहिजे. परिणामतः श्रीमंत आणि गरीब यामधील अंतर कमी होऊन समाजात आर्थिक समता प्रस्थापित होईल. भांडवलदारांनी नैतिकदृष्ट्या विश्वस्त वृत्तीने वागण्याचे नाकारले तर कामगारांनी भांडवलदारांना सहकार्य देऊ नये असा विचार गांधीजींनी मांडला. त्यांनी समाजाने आणि कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेपर्यंत संपत्ती बाळगावी.

गांधीजींनी आधी केले मग सांगितले या न्यायाने विश्वस्तपणाचे तत्त्व जगाला आचरणात आणायला सांगण्याआधी आपल्या सर्व मिळकतीचा विश्वस्तनिधी दक्षिण आफ्रिकेत असतानाच केला होता. आणि त्या स्वानुभवाच्या बळावर ते धनिक वर्गाला आपल्या पैशाचे समाजासाठी विश्वस्त होण्याचे आवाहन करीत होते. त्यांच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन भारतात अनेक ठिकाणी धनिक जागोजागी पुढे येऊ लागले आणि ठीक ठिकाणी लहान मोठे विश्वस्त निधी निर्माण झाले.

समाजात सर्वत्र विषमता व शोषण आढळते आणि त्यामुळे समाजामध्ये वर्ग विग्रह चालू असतो त्याला पर्याय म्हणून गांधीजींनी विश्वस्तपणाचा सिद्धांत मांडला. समाजात असणारी असमानता ही त्याची दुर्बलता वाढवणारी असून मानवी विकासात ती अडचण निर्माण करणारी आहे. समाजात जितका मोठा दलित वर्ग राहील त्या प्रमाणात समाज दुबळा राहणार. मानवजात जो विकास करून इच्छिते त्यात हा मागासलेला व दलित वर्ग अडचण निर्माण करतो. म्हणून प्राचीन काळापासून ही विषमता दूर करण्याचे प्रयत्न झाले होते. परंतु मागील २०० वर्षापासून अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्राबल्य वाढले आणि जगापुढे आर्थिक प्रश्न फार गुंतागुंतीचे व जटिल बनले. आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात वाढली. ही आर्थिक विषमता दूर करण्याचे प्रथम प्रयत्न युरोपमध्ये सुरू होणे स्वाभाविक होते. कारण तेथे यांत्रिकीकरण प्रथम आले. शोषित मजूर वर्गाला जागृत करून त्यांना आपल्या शोषणाची आठवण पहिल्यांदा करून देण्यात आली. त्यांना एकत्रित करून भांडवलशाहीला तोंड देण्यात आले. कारण पैशाच्या जोरावर काही लोक लाखो लोकांच्या श्रमाचा फायदा घेत असत. त्यांच्यावर सत्ता गाजवून त्यांचे शोषण करीत असत. अशावेळी विश्वस्त कल्पनेच्या माध्यमातून समाजातील आर्थिक विषमता दूर होईल हा महात्मा गांधींना विश्वास होता.

**विश्वस्त कल्पनेचा मसुदयामधील मुद्दे:** गांधीजींनी आपल्या विश्वस्तवृत्तीच्या कल्पनेची अनेकांशी चर्चा करूनया कल्पनेत बदलही केला.या कल्पनेचा अंतिम मसुदा गांधीजींनी १९४४ मध्ये दुरुस्त केला. या मसुद्यामध्ये खालील मुद्दे समाविष्ट करण्यात आले.

१. सध्याची भांडवलशाही समाज पद्धती बदलून समतेवर आधारलेली समाजपद्धती निर्माण करण्याचे साधन विश्वस्तपणाच्या कल्पनेने पुरविले आहे. विश्वस्तपणाच्या कल्पनेत भांडवलशाहीला थारा नाही. मानवी स्वभाव सुधारू शकतो या श्रद्धेवर विश्वस्तपणाची कल्पना आधारलेली आहे. सध्याच्या भांडवलशाहीपद्धतीचे रूपांतर सर्व समान अशा व्यवस्थेत रूपांतरित करायचे आहे.

२.समाजाने आपल्या कल्याणासाठी जेवढी मालमत्ता बाळगली पाहिजे. त्यापेक्षा अधिक खाजगी मालमत्ता बाळगण्याचा अधिकार या कल्पनेला मान्य नाही.खाजगी मालकीचा हक्क राहणार नाही.

३. मालकी हक्क व संपत्तीचा उपभोग यांचे नियंत्रण करण्यासाठी कायदा करणे या कल्पनेस मान्य होते. संपत्तीची मालकी आणि वापर यासाठी कायदेशीर नियमन राहील.

४. विश्वस्तपणाच्या तत्त्वाप्रमाणे कोणाही व्यक्तीला आपली संपत्ती केवळ आपल्या सुखासाठी किंवा समाजहिताची पर्वा न करता धारण करता येणार नाही किंवा वापरता येणार नाही

५.जसे कामगारांचे किमान वेतन ठरवावे अशी योजना आहे. तशीच समाजातील प्रत्येक व्यक्तीला जास्तीत जास्त किती प्राप्ती मिळवता येईल याचीही मर्यादा ठरविणे आवश्यक आहे. अशा किमान व कमालप्राप्ती मधील अंतर योग्य व न्याय्य असावे आणि वेळोवेळी ते अंतर इतके बदलले जावे की त्यामुळे हे अंतर नाहीसेच व्हावे.

६ गांधीजींच्या अर्थव्यवस्थेप्रमाणे उत्पादनाचे स्वरूप समाजाच्या गरजेवरून ठरेल. व्यक्तीच्या लहरीवरून किंवा लोभावरून ठरणार नाही.

गांधीजी द्रष्टे होते. त्यांनी समाजहिताच्या दृष्टीने विश्वस्त सिद्धांत मांडला. भांडवलदारांचे व सामान्य जनतेचे हित यात आहे की त्यांनी मिळून मिसळून एकाने दुसऱ्याच्या हिताचे रक्षण करावे. भारताला जर सुख, शांती व समृद्धी

हवी असेल तर त्यासाठी गांधींचा मार्ग अचूक व्यवहारी आहे. भांडवलदारांना साम्यवादाचा धोका नको असेल तर विश्वस्ततेचा सिद्धांत अमलात आणतील असा गांधीजींना विश्वास होता.

गांधीजींच्या सर्व विचारांच्या मुळाशी अहिंसेचे तत्व आहे. गांधीजींच्या मते समाजातील आर्थिक विषमता अत्यंत शांत मार्गाने कोणाचाही द्वेष न करता, कोणावर जबरदस्ती न करता अहिंसेच्या मार्गाने दूर करणे शक्य आहे आणि हा अहिंसेचा मार्ग म्हणजेच विश्वस्तवृत्ती किंवा विश्वस्तपणाची कल्पना होय.

**विश्वस्त कल्पनेचेमूल्यमापन:** महात्मा गांधीजींची विश्वस्त कल्पना ही त्यांच्या आर्थिक विचारांपैकी एक महत्त्वाची कल्पना आहे. परंतु पुढील काळात या कल्पनेच्या मर्यादा दिसून आल्या. त्यामुळे विश्वस्त कल्पनेच्या यशापयशाचा विचार करणे उचित ठरेल.

१. महात्मा गांधी यांच्या विश्वस्त कल्पनेतून प्रेरणा घेऊन विनोबाजी भावे यांनी भूदान चळवळ राबवली.'सर्व भूमी गोपाळाची' असे विधान त्यांनी केले होते. भूदान चळवळीतून मिळालेल्या भूमीचे वाटप भूमिहीन गोर गरीब जनतेला केले. हे विश्वस्त कल्पनेचे यश म्हणावे लागेल.

२. गिरणी कामगारांच्या हितासाठी स्थापन झालेली अहमदाबादची मजूर महाजन संस्था म्हणजे या दृष्टीने टाकलेले एक पाऊल होय. त्यानंतरच्या काळात भारतामध्ये विश्वस्त कल्पनेतून प्रेरणा घेऊन सर्वसामान्यांसाठी अशा संस्थांची स्थापना झाली.

३. भारतातील धनिकांपैकी जे लोक त्यांच्या आवाहनुसार पुढे आले त्यापैकी एक प्रमुख धनीक म्हणजे श्री. जमनालाल बजाज होत. त्यांनी जमनालाल सेवा ट्रस्ट, वर्धा नावाचा आपला अतिरिक्त संपत्तीचा विश्वस्त निधी निर्माण केला आणि ते त्यांचे पहिले विश्वस्त झाले. यासंदर्भात गांधीजी श्री. जमनालाल बजाज यांचा नेहमी उल्लेख करीत असत. एवढेच नव्हे तर गांधीजी त्यांना व्यापारी राजपुत्र असे म्हणत असत.

४. गांधीजींची विश्वस्तपणाची योजना ही अहिंसक मार्गाने आर्थिक समता प्रस्थापित करणारी जगातील पहिलीच योजना नव्हे.१९ व्या शतकात होऊन गेलेल्या अनेक स्वप्नाळू समाजवाद्यांनी अहिंसक मार्गाने समाजातील आर्थिक विषमता दूर करण्याच्या अनेक योजना मांडल्या. एवढेच नव्हे तर त्या आपल्या कल्पनांचे प्रयोगही केले परंतु ते सर्व फसले. गांधीजींची विश्वस्त कल्पना चांगली असली तरी ती एकोणिसाव्या शतकातील स्वप्नाळू समाजवाद्यांसारखी स्वप्नाळू आहे म्हणून ती यशस्वी होणे शक्य नाही अशी टीका केली जाते.

५. गांधीजींची विश्वस्तपणाची कल्पना श्रीमंतांच्या हृदय परिवर्तनावर अवलंबून आहे. गांधीजींना वाटत होते की त्यांनी आवाहन केल्यावर श्रीमंतांचे हृदय परिवर्तन होईल. परंतु भारतातील श्रीमंतांचे हृदय परिवर्तन करता आले नाही. उलट श्रीमंतांनी गांधींच्या आश्रयाने आपली तुंबडी भरण्याचा प्रयत्न केला अशी टीका केली जातेएस.

६. गांधींच्या नंतर गांधीवाद विसरला गेला. खुद्द गांधीजींचाही लोकांनी विसर पडला आहे. तेव्हा त्यांच्या विश्वस्त कल्पनेची लोकांना आठवण होणे कठीण वाटते. मग ती प्रत्यक्षात अमलात येणे दूरच राहिले.

७. सध्या जगभर भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा झंजावात आला आहे.प्रत्येक देश आपल्या आर्थिक विकासासाठी भांडवलशाहीची कास धरत आहे. गांधीजींची विश्वस्तपणाची योजना भांडवलशाहीच्या झंजावातासमोर टिकणे अशक्य आहे असे प्रतिपादन केले जाते.

महात्मा गांधी यांच्या विश्वस्त कल्पनेवर टीका केली जात असली तरी जगातील वाढती विषमता लक्षात घेता आर्थिक आणि सामाजिक समतेच्या दृष्टीने ती निश्चितपणे दिशादर्शक आहे.

**संदर्भ सूची:**

१. कोंडेवार यु. बी., आणि कोंडेवार स्मिता,(२००५)आर्थिक विचारांचा इतिहास, शोभा भारती प्रकाशन, लातूर

२. शिखरे द. न., म. गांधी गौरव ग्रंथ, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे

३. पाटील जे. एफ.,(२००९),आर्थिक विचारांचा इतिहास,फडके प्रकाशन, कोल्हापूर

४. ठक्कर के. एच., (२००५), अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास,फडके प्रकाशन, कोल्हापूर

५. तायडे पुष्पा, महात्मा गांधींचे अर्थशास्त्र : एक अन्वयार्थ, अर्थसंवाद, खंड ४८, अंक २,मराठी अर्थशास्त्र परिषद, जुलै-सप्टेंबर २०१८

६. https://www.mkgandhi.org>articles